# जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपुर यांचे कार्यालय

**डॉ. राजकुमार प्रतापसिंग गहलोत**
(एम.बी.बी.एस., डि.पी.एच., एम.आय.पी.एच.ए.)

एनएचएम सेल, टि.बी. हॉस्पीटल परिसर, डॉ. आंबेडकर कॉलेज समोर, रामनगर, चंद्रपुर – 442401

दुरध्वनी – 07172 – 270659, 253275 dhocha@gmail.com, dpmchandrapur2018@gmail.com


जा.क्र.राआअ/मोमेयु/दरपत्रक/ 1046 /२०२३
दिनांक - 29/8/2023

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**विषय - तालुका जिवती व कोरपना येथील दुर्गम आणि अतिदुर्गम भागामध्ये मोबाईल मेडिकल युनिटची सेवा देणेकरीता दरपत्रक सादर करणेबाबत........**

संदर्भ- १) मा.सहसंचालक (तांत्रिक)राष्ट्रिय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/ MMU/ ६३२११-२९४/२०२३ दिनांक ०८/०८/२०२३
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टिपणी पृष्ठ क्र.३५ वर दिनांक २८/०८/२०२३ रोजी दिलेल्या सुचनांन्वये,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस कळविण्यात येते की, मोबाईल मेडिकल युनिट उपक्रमांतर्गत जिल्हयात दुर्गम आणि अतिदुर्गम भागामध्ये ज्या ठिकाणी आरोग्याच्या सेवांपासुन लोक वंचित राहतात अशा लोकांना आरोग्याच्या सेवा देण्याकरीता केंदशासनाच्या मार्गदर्शक सुचनान्वये, राज्यस्तरावरुन नविन निविदा प्रक्रिया प्राप्त होईपर्यंत जिल्हास्तरावर मोबाईल मेडिकल युनिट कार्यान्वीत करावयाचे आहे.

त्याअनुषंगाने चंद्रपूर जिल्हयाकरीता तालुका जिवती व तालुका कोरपना येथील दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये लोकांना आरोग्याच्या सेवा देण्याकरीता मोबाईल मेडिकल युनिट या उपक्रमाची आवश्यकता आहे. करीता खाली दिलेल्या प्राप्त सुचनेनुसार मोबाईल मेडिकल युनिटची सेवा कार्यान्वीत करण्याकरीता या कार्यालयाद्वारे दरपत्रक मागणी करण्यात येत आहे.

१) मोबाईल मेडिकल युनिटसाठी बोलेरो किंवा त्या स्वरुपाचे T-permit वाहन असावे.सदर वाहनास आरटीओच्या प्रती महिना दराप्रमाणे वाहनभाडे देण्यात येईल.
२) सदर मोबाईल मेडिकल युनिटसाठी १ डॉक्टर,१ नर्स,१ प्रयोगशाळा तंत्रज्ञ,१ फार्मसिस्ट या कर्मचारी मार्फत युनिट चालविण्यात यावी.
३) सदर मोबाईल मेडिकल युनिट चालविण्यासाठी जास्तीत जास्त रक्कम रु.१.१५ लक्ष प्रति महिना निधी देण्यात येईल. तसेच संबधीत तालुका अंतर्गत एकुण ६० गावांतील लोकांना सेवा देणे बंधनकारक राहील.

तरी, उक्त दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने राज्यस्तरावरुन नविन पुरवठादाराची निवड होईपर्यंत खालील दिलेल्या तक्यात दर्शविल्याप्रमाणे, सोयी सुविधा व दर आपल्याकडुन मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | सोयी सुविधा | दर |
|---|---|---|
| १ | ATP नुसार गावामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांची सर्व तपासणी करणे | |
| २ | सर्व आवश्यक चाचण्या करुन त्याचा अहवाल विहित वेळेत सादर करणे | |
| ३ | गावातील सर्व गरोदर माता व गंभीर आजारी बालकांची तपासणी करणे | |
| ४ | असंसर्गजन्य आजाराबाबत गावातील सर्व लाभार्थ्यांची तपासणी करणे | |
| ५ | आवश्यक सर्व लागणारी औषधी व इतर गरजेनुसार रुग्ण तपासणीसाठी लागणारे साहित्य पुरवठा करणे | |

जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपुर यांचे कार्यालय

**डॉ. राजकुमार प्रतापसिंग गहलोत**
(एम.बी.बी.एस., डि.पी.एच., एम.आय.पी.एच.ए.)

एनएचएम सेल, टि.बी. हॉस्पीटल परिसर,
डॉ. आंबेडकर कॉलेज समोर, रामनगर,
चंद्रपुर – 442401

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी – 07172 – 270659, 253275 dhocha@gmail.com, dpmchandrapur2018@gmail.com

वरील सर्व सोयी सुविधांचे निश्चित दर उपलब्ध निधीच्या आधिन राहुन ७ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत मा.जिल्हा आरोग्य अधिकारी. यांचे कार्यालयात बंद लिफाफ्यात सादर करावे.

ज्या संस्थेद्वारे देण्यात येणारे सोयी सुविधांचे दर माफक दरात प्राप्त होईल, त्या संस्थेची निवड जिल्हास्तरावरुन करण्यात येईल.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र